# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ , अकोला

## कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि. वर्धा

# कृषि विषयक संदेश

## ऑगस्ट महिन्यात करावयाची कामे

- कपाशी पिकाच्या वाढीच्या अवस्थेत किंवा शेवटच्या डवरणीच्या वेळी डवऱ्याच्या दात्याला दोरी बांधून सरी काढावी. कपाशी पिकामध्ये पेरणीनंतर ४० ते ६० दिवसांनी सऱ्या काढाव्यात व अतिवृष्टी झाल्यास जास्तीचे पाणी चर काढून बाहेर काढावे.
- नत्रयुक्त खतांचा वरखते म्हणून वापर करताना बागायती कपाशीसाठी १/३ नत्राची मात्रा उगवणीनंतर १ महिन्याने आणि उरलेली १/३ नत्राची मात्रा उगवणीनंतर २ महिन्यांनी द्यावी. ठिबक संचातून खतमात्रा देताना ती पिकाच्या वाढ अवस्थेनुसार लागवडीपासून २० दिवसाच्या अंतराने ५ समान भागात द्यावी. नत्रयुक्त खाते पिकांना विभागून दिल्यास त्याचा पिकांना भरपूर फायदा होऊन खतांची कार्यक्षमतासुद्धा वाढते.
- सोयाबीन पिकात चुनखडीयुक्त जमिनीमध्ये लोहाच्या कमतरतेमुळे सोयाबीनची पाने पिवळी पडतात व योग्य उत्पादन मिळत नाही, त्यामुळे माती परीक्षण करून घेणे आवश्यक आहे.चुनखडीयुक्त जमिनीत लोहाची कमतरता असल्यास ०.५% (५० ग्रॅम)फेरस सल्फेट + ०.२५ टक्के (२५ ग्रॅम) कळीचा चुना +१० लिटर पाणी या मिश्रणाची फवारणी किंवा चीलेटेड लोह १० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून दोन वेळा फवारणी करावी म्हणजे पहिली फवारणी पीक फुलावर येण्यापूर्वीआणि दुसरी शेंगा धरण्याच्या अवस्थेमध्ये.
- सोयाबीन पिकात झिंकची कमतरता आढळल्यास ५० ग्रॅम झिंक सल्फेट प्रति १० लिटर पाणी किंवा झिंक इडीटीए २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे पिक उगवणीनंतर ३०, ४५ व ६० दिवसांनी फवारणी करावी.
- सलग सोयाबीनमध्ये शाखीय वाढीसाठी फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये १५ पीपीएम जिब्रेलिक ॲसिडची म्हणजेच ८.३ ग्रॅम जिब्रेलिक आम्ल (९०% क्रियाशील घटक) प्रति हेक्टर ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.
- सोयाबीन पिक फुलोरा अवस्थेत येत असल्यास २ टक्के युरियाची फवारणी करावी.
- ढगाळ व पावसाळी वातावरण तसेच धुके किंवा पाऊस असताना तणनाशकाची फवारणी करू नये.
- २,४ डी या तणनाशकाचा कपाशी पिकावर दुष्परिणाम झाल्यास परिणाम कमी करण्यासाठी पाण्याची फवारणी करावी-, तसेच नवीन फुट चांगली येण्यासाठी युरिया एक टक्का (लीटर पाण्यात १० ग्रॅम युरिया प्रती १००)फवारणी करावी .
- जमिनीत तणनाशकाचा अंश वाढीस आळा घालण्यासाठी वारंवार एकच एक तणनाशक न वापरता तणनाशकांचा आलटून पालटून वापर करावा .

# कृषि सल्ला – पिक संरक्षण (कीड व रोग)

## किडी:

- सोयाबीन पिकावरील खोडमाशी (आर्थिक नुकसान पातळी १० टक्के प्रादुर्भावग्रस्त रोपे) व्यवस्थापनासाठी क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. २ मी.ली. किंवा इथिऑन ५० टक्के प्रवाही १५ मिलि. किंवा थायोमेथोक्झम १२.६ टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ९.५ टक्के @ २.५ मिलि किवा इंडोक्झाकार्ब १५.८ ई.सी. ६.६ मिलि किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल ९.३० टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ४.६० टक्के @ ४ मिलि किंवा बीटासायफ्लूथ्रिन ८.४९ टक्के + इमिडाक्लोप्रीड १९.८१ टक्के @ ७ मिलि वरील पैकी कुठलेही एक किटकनाशक प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच चक्रीभुंगा (आर्थिक नुकसान पातळी फुलोरयापुर्वी ३ ते ५ चक्रीभुंगा प्रति मीटर ओळ) किडीच्या व्यवस्थापनासाठी क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ३ मी.ली. किंवा इथिऑन ५० टक्के प्रवाही १५ ते ३० मिलि. किंवा थायोमेथोक्झम १२.६ टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ९.५ टक्के @ २.५ मिलि किवा इंडोक्झाकार्ब १५.८ ई.सी. ६.६ मिलि किंवा क्लोरांट्रानिलीप्रोल ९.३० टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ४.६० टक्के @ ४ मिलि किंवा बीटासायफ्लूथ्रिन ८.४९ टक्के + इमिडाक्लोप्रीड १९.८१ टक्के@ ७ मिलि प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पांढर्‍या माशीचा तसेच मावा तुडतुडे यांचा प्रादुर्भाव दिसल्यास त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पिवळे चिकट सापळे १५ x ३० से.मी. आकाराचे किवा तत्सम आकाराचे ६४ प्रती एकर याप्रमाणे लावावेत. तसेच ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.

- कापूस पिकातील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी कपाशीला पात्या लागण्यास सुरुवात झाल्यानंतर पिकामध्ये टेहाळणीसाठी एकरी 2 फेरोमोन सापळे याप्रमाणे लावणे , वेष्ठनावरील सुचणे नुसार विशिष्ट कलावधीत वडया (लुर) बदलाव्या व दर आठवड्याने पतंग मोजून नष्ट करावे. कपाशीला पात्या आल्यानंतर ७ ते ८ वेळा पिकामध्ये दर १० दिवसानंतर ट्रायकोग्रामा बॅक्ट्री या परोपजीवी मित्रकीटक असलेले ट्रायकोकार्ड एकरी ३ कार्ड कपाशीच्या शेतामध्ये सोडवित. फुलोरा अवस्थेत दर आठवड्याने गुलाबी बोंडअळीग्रस्त डोमकळ्या शोधून नष्ट कराव्यात. फुले व बोंड धरण्याच्या अवस्थेत ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझँडीरेक्टिन ३०० पी.पी.एम. ५० मी.ली. किंवा वातावरणात पुरेशी आर्द्रता असतांना बिव्हेरिया बॅसीयाणा १.१५ टक्के डब्ल्यु. पी. ५० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच ५ ते १० टक्के प्रादुर्भावग्रस्त फुले (डोमकळ्या)/पात्या/बोंडे आढळल्यास थायोडीकार्ब ७५ टक्के डब्लु. पी. २० ग्रॅम किवा क्वीनोल फॉस २० टक्के ए.एफ. २५ मिलि किवा सायपरमेथ्रिन १० टक्के प्रवाही ७.६ मिलि किवा

KVK WARDHA

क्लोरांट्रानीलिप्रोल ९.३ टक्के + लॅमडा सायहलोथ्रिन ४.६ टक्के झेड.सी. @ ५ मिलि किंवा डेल्टामेथ्रिन १ टक्के + ट्रायझोफोस ३५ टक्के प्रवाही १० ते १२.५ मिलि किंवा क्लोरपायरीफोस + सायपरमेथ्रिन ५ टक्के @ १० मिलि वरीलपैकी कुठलेही एक कीटकनाशक १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

- ज्वारी पिकातील खोडकीडीच्या व्यवस्थापनासाठी ज्वारीच्या पानावरील अंडीपुंज पानासाहित तोडून त्यांचा नायनाट करावा. खोडकीडीचे जैविक पद्धतीने व्यवस्थापनासाठी करण्याकरिता ट्रायाकोग्रामा चीलोनीस या परोपजीवी किटकाची अंडी १.५ लाख प्रति हेक्टरी पिक उगवणी नंतर ३० आणि ४० व्या दिवशी सोडवीत. खोडकीडीचा प्रादुर्भाव दिसताच कार्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार ८.३ किलो प्रति हेक्टरी पोंग्यामध्ये द्यावे.

**रोग:**

- सद्यस्थितीत सतत पाऊस झाल्यामुळे शेतामध्ये साचलेले अतिरिक्त पाणी शेताच्या बाहेर काढावे.
- सोयाबीन पिकामध्ये मर आणि चारकोल रॉट रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून दोन किलो ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रात पसरवून मातीमध्ये मिसळावे.
- कापूस पिकावरील आकस्मित मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्राम अधिक १५० ग्राम युरिया १० लिटर पाण्यामध्ये मिसळून प्रादुर्भावग्रस्त झाडालगत साधारण १०० मि.ली. द्रावण पडेल याप्रमाणे बांगडी पद्धतीने देऊन झाडाचे खोड व्यवस्थित दाबून घ्यावे.
- तूर पिकातील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून दोन किलो ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रात पसरवून मातीमध्ये मिसळावे.
- भाजीपाला पिकातील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून दोन किलो ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रात पसरवून मातीमध्ये मिसळावे.

KVK WARDHA